वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४ पाने ४ किंमत ३

# बीड मतदार संघात संदीपभैय्यांची तुफान क्रेझ अन् अफाट लोकप्रियतेने विरोधकांच्या ठिकऱ्या उडाल्या



## आजच्या पाठींब्याने तर युवराज च्या पराजया वर शिक्काच मोर्तब झाल्याची मतदारात जोरात चर्चा

दिव्य वार्ता

बीड, (दिव्य न्युज):-निवडणूक आली म्हणून विरोधकांकडून बिनबुडाचे आरोप केले जात असले तरी आपल्या भागाचा विकास कोण करू शकतो याची जाणीव असल्याने अनेक कार्यकर्ते आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांचे नेतृत्व मान्य करत आपल्या मतांची ताकद त्यांच्या पाठीशी उभी करू लागले आहेत.बीड शहरातील भालदारपुरा येथील फारूक खान जहागीरदार मित्र मंडळाने मोठ्या संख्येने आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहिर प्रवेश केला.या निवडणुकीत आम्ही संदीप भैय्यांना प्रचंड बहुमतांनी विजयी करू असा

▶▶ पान २ वर

## मागच्या निवडणूकीत एकसोबत असतांना पराभव झाला, आता पुन्हा तीच पुनरावृत्ती घडणार



### २०१९ ला क्षीरसागरांमुळे अन् आत्ताही क्षीरसागरांमुळेच माझी उमेदवारी गेली

# दादांचा शिवसेनेला कायमचा जय महाराष्ट्र

### ३९ वर्षे माय-बाप जनतेची सेवा केली, ते मला विजयी करतीलच

**बीड,(दिव्य न्युज):- गेल्या चाळीस वर्षांपासून मी प्रामाणिकतेने आणि निष्ठेने शिवसेनेत सक्रिय असून शिवसेनेच्या माध्यमातून मी जनसेवा करत आलो आहे, सर्वसामान्यांचे समस्या अडचणी सोडवत आलो आहे. परंतु वारंवार शिवसेनेने माझ्यावर अन्याय करत मला डावलले आहे. जेंव्हाही विधानसभा निवडणुकीची तयारी केली तेंव्हा तेंव्हा मला सोडून उमेदवारीची माळ दुसऱ्याच्या गळ्यात घालण्यात आली.**

बीडमधील अठरा पगड जाती धर्मातील जनसमुदाय माझ्याजवळ येऊन वारंवार दुःख व्यक्त करतो की, सातत्याने शिवसेनेकडून अन्याय तुमच्यावर होतो तरी तुम्ही का हा अन्याय सहन करतात? पण आता बस्स, मी वैतागलोय या अन्यायाला. आता सहन होत नाही. त्यामुळे मी आणि माझे सर्व सहकारी पदाधिकारी शिवसेनेला कायमचा जय महाराष्ट्र ठोकून माझ्या जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा देत आहोत. असे अनिलदादा जगताप यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केले. इथून पुढे मला मानणारी सर्व जाती धर्मातील जनताच माझी नेता आणि सन्मानीय मनोजदादा जरांगे

▶▶ पान २ वर

# ॲड. शेख शफिक भाऊ यांच्या भूमिकाकडे समाजाचे लक्ष

### लोकसभेप्रमाणे विधानसभेतही महत्वाची भुमिका



### कोणीही मुस्लिम समाजाची मत स्वत: ची जहागिरी समजू नये

बीड,(दिव्य न्युज):- विधानसभा निवडणुकीचे मतदान येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. आता मतदानाला फक्त एक आठवड्याचा कालावधी उरलेला असतानाही एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी अजून पर्यंत आपली भूमिका जाहीर न केल्याने मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात शफिक भाऊंनी आपली भूमिका कधी जाहीर करतात व काय निर्णय घेतात याकडे सर्व मुस्लिम समाजाचे लक्ष आहे.

एआयएमआयएम पक्षाने बीड विधानसभा मतदारसंघातून उमेदवार दिला नाही. तसेच पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊंनी भरलेला अपक्ष उमेदवारी अर्ज सुद्धा मागे घेतला आहे. आणि आता

▶▶ पान २ वर

# धर्मगुरूंनी पूढे येऊन योग्य निर्णय घ्यावा- मजहर खान

बीड,(दिव्य न्युज):- बीड मतदार संघात मुस्लिम मतदारांची संख्या ८५ हजाराच्या जवळपास आहे. मतदार संघात एकूण



३१ उमेदवार निवडणुकी रिंगणात असून जशी जशी मतदानांची तारीख जवळ येत आहे, तशी तशी प्रचाराचा धडाका वाढत आहे.बीडमध्ये स्थानिक निवडणुकींमध्ये मुस्लिम समाजाचे धार्मिक नेते, म्हणजे उलेमा, आलेम, आणि मौलाना हे निवडणूक प्रक्रियेपासून बाजूला राहण्याचा निर्णय घेत आहेत, ज्याचा परिणाम म्हणून मुस्लिम समाजाचे नुकसान होत आहे. अशा वेळी, समाजातील नेत्यांकडून अपेक्षा आहे की त्यांनी योग्य निर्णय घेऊन मुस्लिम समाजाचे ऐकून त्यांच्या गरजा आणि हित लक्षात घेऊन त्यांच्या उमेदवारांना समर्थन द्यावे.अशी मागणी पत्रकाद्वारे बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार मझहर खान

▶▶ पान २ वर

# योगेश क्षीरसागरांसाठी आज आ.पंकजा मुंडेंची तर उद्या ना.अजित पवारांची सभा

बीड,(दिव्य न्युज):- बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्यासाठी महायुतीच्या दिग्गज नेत्यांच्या सभा होत आहेत. आज (दि.१२) भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांची तर राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची उद्या (दि.१३) बीडमध्ये सभा होणार आहे.

बीड विधानसभा मतदारसंघातील शिरूर कासार तालुक्यातील रायमोह येथे भाजपच्या राष्ट्रीय

▶▶ पान २ वर



# राजकारणासाठी स्व.गोपीनाथ मुंडेंच्या फोटोचा वापर करणाऱ्या माधव निर्मळांचा हेतू गढूळ

### कार्यक्रम संपताच स्टेजच्या खाली फोटो पायदळी





माजलगाव,(दिव्य न्युज):- विधानसभेची रणधुमाळी सुरू आहे पक्ष आणि अपक्षांनी मतदारसंघात जोरदार निवडून येण्यासाठी तयारी सुरू केली आहे. अठरा पगड जाती धर्माचा देव समजणाऱ्या गोपीनाथ मुंडेंना माजलगाव विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचा निवडणुकीत कामापुरता बाजार मांडला असल्याची चर्चा मतदारसंघात आहे. निर्मळ यांनी फॉर्म भरण्याच्या कार्यक्रमात गोपीनाथ मुंडेंची प्रतिमा डोक्यावर घेऊन दाखवली आणि कार्यक्रम संपताच गोपीनाथ मुंडेंची प्रतिमा पायंदळी ठेवली. त्यामुळे अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांची बुद्धीमत्ता, विचार आणि मानसिकता निर्मळ नसून गढूळ आहे असेच मतदारसंघात चर्चिले जात आहे . त्यामुळे पंकजा मुंडें व गोपीनाथ

▶▶ पान २ वर

# 'मदरशांमधील शिक्षणाची पदवी घटनाबाह्य'

### युपीतील २५ हजार विद्यार्थ्यांना फटका

नवी दिल्ली, (वृत्तसेवा) 'मदरसा बोर्डाचे रजिस्ट्रार आर. पी. सिंह यांनी सांगितले, 'सध्या बोर्डामार्फत चालविल्या जाणाऱ्या कामिल आणि फजिल अभ्यासक्रमात सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि सरकार जो निर्णय घेईल त्याचे पालन केले जाईल.' दरम्यान, उत्तर प्रदेशात सुमारे २५,००० मदरसे आहेत. त्यापैकी १६,५०० मदरसे राज्य बोर्डाकडून मान्यताप्राप्त असून, ८५०० विनामान्यताप्राप्त आहेत, असे सरकारी सूत्रांनी म्हटले आहे.सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश मदरसा बोर्डाने दिलेली उच्च

▶▶ पान २ वर



# महाआघाडी सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना तीन लाखापर्यंतची कर्जमाफी-आदित्य ठाकरे

### राज्यातील अंधार दूर करण्यासाठी शिवसेनेची मशाल पेटवा

गेवराई (दिव्य न्युज):- उद्धव साहेब मुख्यमंत्री झाले तेव्हा आपण शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. त्यानंतर आलेल्या मिंदे सरकारने शेतकऱ्यांसाठी काहीच केलं नाही. म्हणून आता महाविकास आघाडी व शिवसेनेची मशाल पेटवून राज्यातील अंधार दूर करण्यासाठी बदामराव पंडितांना निवडून द्या. असे आवाहन युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले.

आता राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असून या काळात शेतकऱ्यांसाठीच काम करणार आसून सत्तेवर आल्यावर सर्वात आधी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून शेतकरी कर्जमुक्ती करणार असल्याचे प्रतिपादन युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले.

गेवराई मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारार्थ युवासेना प्रमुख

▶▶ पान २ वर



# हिंदूंच्या संख्येत तब्बल 'इतक्या' टक्क्यांची घट

### कोणाचा वाढला आकडा?

मुंबई, (दिव्य न्युज):- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक नवनवीन मुद्दे चर्चेचा विषय बनत आहेत. अशातच आता महाराष्ट्रात बटोगे तो कटोगे आणि एक है तो सेफ है या दोन नव्या घोषणांनी प्रचंड धुमाकूळ घालत आहेत. मात्र आता या दोनही घोषणांनी राज्यातील वातावरण चांगलच तापलं आहे.



राज्यात हिंदू आणि मुस्लिम ध्रुवीकरणाचा मुद्दा चर्चेत आहे. कारण मुंबईत हिंदूंची संख्या कमी होत असल्याचा दावा एका रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. यासंदर्भात अधिक

▶▶ पान २ वर

## हेलिकॉप्टरमधील बॅग तपासणीवरून उद्धव ठाकरेंचा संताप

# माझ्या खिशात हात का घातला?

यवतमाळ, (वृत्तसेवा):– वणी मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देरकर यांच्या प्रचारासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व आमदार मिलिंद नार्वेकर हे सोमवारी वणी येथे आले होते. कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर त्यांचे हेलिकॉप्टरने आगमन झाले होते. मात्र तिथे निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या पथकाकडून ठाकरे व नार्वेकर दोघांच्याही हेलिकॉप्टरमधील बॅगची तपासणी करण्यात आली. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांनी तपासणी करणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना कडक शब्दांत जाब विचारला. इतकेच नव्हे तर वाद घालून त्यांच्याशी संवादाचा व्हिडिओही सोशल मीडियावर प्रसारित करण्याची व्यवस्था केली. 'आमच्या बॅगची तपासणी करता? तुम्ही मिंध्यांच्या (शिंदे) बॅगची कधी तपासणी केली का? मोदी–शाह यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी केली का? जशा आमच्या बॅगा तपासता तशा पाठवा,' असे त्यांनी सुनावले. मात्र अधिकाऱ्यांनी तपासणीचे काम पूर्ण केले. बॅगांमध्ये काहीच आक्षेपार्ह सापडले नाही. 'वणी येथे तुमचाच पहिला दौरा आहे, त्यामुळे तुमच्या बॅगची तपासणी केली जातेय,' असे निवडणूक कर्मचाऱ्यांनी ठाकरेंना सांगितले. पण त्यावर त्यांचे समाधान झाले नाही.

### मोदी, शाह, शिंदे, फडणवीसांच्या बॅगा तपासून मला व्हिडिओ पाठवा, तेव्हा शेपूट घालू नका : ठाकरे



### माझे युरिन पॉटही तपासा

'मी अजिबात रागावलो नाही. तुम्ही तुमचे काम करताय, मी माझे काम करतोय. तुम्ही मोदी, शाह, शिंदे, अजित पवार, फडणवीस यांची बॅग तपासली का? माझं युरिन पॉटही तपासा. पण मोदींची बॅग तपासतानाचा व्हिडिओ मला आला पाहिजे. तिथे शेपूट घालू नका,' असे ठाकरेंनी सुनावले.

### तर माझे शिवसैनिक तपासतील

लोकसभेवेळी शिंदे सरकारने अनेक बॅगा भरून आणल्या. त्या वेळी बॅगा तपासल्या नाही. पैसे वाटण्याचं काम यांचं आहे, आमचं नाही. त्यामुळे शिंदे सरकारमधील सर्वांच्या बॅगची तपासणी झाली पाहिजे. हे संविधानविरोधी सरकार आहे. जर अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी केली नाही तर माझे शिवसैनिकच तपासणी करतील,' असे ठाकरे म्हणाले.

## भाऊ लक्षात ठेवा... सर सलामत तो पगडी पचास

हातात घट्ट पकडून ठेवलेली वाळू मुठीची पकड सैल होताच जशी हळूहळू घसरू लागते तसे काही नेत्यांचे होऊ लागलंय... विदर्भातील सभेसाठी गेलेल्या उद्धव ठाकरेंच्या बॅगांची तपासणी केल्याने त्यांचा पारा चढला. आपल्या 'राजकीय वैऱ्यां'चा राग ठाकरेंनी कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांवर काढून आपलाच बीपी वाढवून घेतला. दुसरीकडे श्रीरामपूरमध्ये मुख्यमंत्र्यांनी सभेला येण्याचा शब्द ऐनवेळी फिरवल्याने त्यांच्या उमेदवाराचाही बीपी वाढलाय. मालेगावातही प्रचाराच्या एका उमेदवाराला दगदगीमुळे हृदयविकाराचा झटका आला. निवडणुकीच्या काळात ताणतणाव इतके वाढलेत की दोन आठवड्यांत चार–पाच उमेदवारांना हॉस्पिटलची पायरी गाठावी लागलीय. जालन्याच्या रावसाहेबांनी मात्र 'अर्जुना'शी जुळवून घेत त्यांचा ताण हलका केलाय, ही त्यातल्या त्यात जमेची बाजू, सत्ता हे अंतिम साध्य नसून जनसेवेचे साधन आहे, या गोष्टी फक्त भाषणातच ऐकायला मिळतात. प्रत्यक्षात सत्तेसाठी साम, दाम, दंड, भेदाचा वापर कसा केला जातो याची उदाहरणे पावलोपावली दिसत आहेत. पण सर सलामत तो पगडी पचास.. हे या नेत्यांना कोण सांगणार?

## खासदार कोल्हेंचीही बॅग तपासली... म्हणाले, 'नियम विरोधकांसाठीच का?'

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांची सोमवारी सांगली जिल्ह्यातील विटा येथे सभा झाली. त्यापूर्वी त्यांच्याही बॅगांची तपासणी करण्यात आली. कोल्हे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली. ते म्हणाले, 'काही वेळापूर्वी उद्धव ठाकरेंच्या बॅगा तपासल्याची माहिती मिळाली. आज पुन्हा माझीही बॅग तपासण्यात आली. विधानसभा निवडणुकीदरम्यान दुसऱ्यांदा तपासणी झाली. नियम असतात हे मान्य आहे, पण नियम फक्त विरोधी पक्षांनाच असतात अन् सत्ताधाऱ्यांना सगळीकडे मोकळे रान असतं हे आम्हाला अजिबात मान्य नाही. कायदा आहे, तर तो सर्वांसाठी समानच असला पाहिजे!' असे मत त्यांनी व्यक्त केले. आमदार रोहित पवार यांनीही बॅगा तपासणीवर टीका केली. ते म्हणाले, 'उद्धव ठाकरे यांच्या बॅगा चेक करून प्रशासनाच्या हाती निराशा लागली. प्रशासनाने महायुतीच्या नेत्यांचे तसेच गुजरात आणि दिल्लीतून येणारे हेलिकॉप्टर आणि विमाने चेक केल्यास त्यांच्या हाती निराशा लागणार नाही. हे दळभद्री सरकार महाराष्ट्राच्या युवांना रोजगार तर देऊ शकले नाही, परंतु हेलिकॉप्टर चेक करण्याच्या निमित्ताने मध्य प्रदेशच्या कॅमेरामनला मात्र रोजगार देत आहे याचा आनंद वाटतोय.'




## खा.बजरंग सोनवणेंच्या नेतृत्वाखाली केजमधून साठे यांना दहा हजार मतांची आघाडी देणार-शदो खतीब



केज, (दिव्य न्युज):– भ्रष्ट मार्गाने कमविलेल्या पैशांतून सामान्य मतदारांना प्रलोभने देण्याचा प्रयत्न होत आहे, स्वाभिमानी मतदार कोणाच्याही अमिषाला बळी पडणार नाही. या निवडणुकीत दलित, वंचित, ओबीसी अल्पसंख्यक आदी मतदार खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी च्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे. गोर–गरीबांच्या सुख–दु:खात साथ देणाऱ्या गरीब सर्वसामान्य उमेदवार पृथ्वीराज साठे यांना विधानसभेत पाठविण्याचा निर्धार मतदारांना केला आहे बदलणाऱ्या काळाबरोबर आपल्याला चालायचे आहे, नवनवीन योजना, उद्योगधंदे आणि रोजगाराच्या संधी आपल्या उपलब्ध करून द्यायच्या आहेत. येणाऱ्या काळामध्ये हे सर्व साध्य करण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना विजयी करा भरघोस आणि प्रचंड मतांनी विजयी करा असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे केज शहराध्यक्ष शदो खतीब यांनी केले आहे.

## संवेदनशील मतदान केंद्र असलेल्या गावांमध्ये गेवराई पोलिसांचे पथसंचलन

गेवराई, (दिव्य न्युज):– विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने, मतदान केंद्रातील गावांमध्ये गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल, केरळ येथील पोलिसांच्या वतीने गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गावामधून पोलिसांनी व जवानांनी सशस्त्रासह पथसंचलन केले.

गेवराई पोलीस ठाण्याअंतर्गत असणारे संवेदनशील मतदान केंद्र मिरकाळा व मुळुकवाडी या गावांमध्ये दिनांक ११ नोव्हेंबर सोमवार रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास पथसंचलन करण्यात आले, मिरकाळा गावातील गल्लीबोळामध्ये सुरुवात करून गावाला वेढा देऊन पोलिसांनी पथसंचलन पूर्ण करून संवेदनशील असलेल्या मुळकवाडी या गावांमध्ये जाऊन मतदान केंद्राच्या समोर पथसंचलनाला सुरुवात केली व गावामध्ये फेरी मारून हे पथसंचलन पूर्ण करण्यात आले. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे पथसंचालन करण्यात आले.निवडणुकीमध्ये मतदानच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडावी यासाठी सशस्त्र पथसंचलन करण्यात आले. केरळ राज्यातील राखीव दलाच्या जवानांनी सशस्त्रासह गावातून पथ संचालन केले. यावेळी गेवराई पोलीस ठाण्यातील पोलीस दलाचाही यामध्ये समावेश होता.

पान १ वरून

### बीड मतदार संघात

निर्धार या सर्वांनी व्यक्त केला.

आ.संदीप क्षीरसागर यांनी शहर असो की, मतदारसंघातील गावे या ठिकाणी विकास निधी खेचून आणत मार्गी लावलेली प्रलंबित कामे यामुळे आपल्या हक्काचा लोकप्रतिनिधी म्हणून आ.संदीप क्षीरसागर यांचे नेतृत्व मान्य करत मतदार संघातील तरुण कार्यकते, मित्रमंडळाचे पदाधिकारी आ.संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश करत आहेत.त्यामुळे पक्षात कार्यकर्त्यांची इन्कमिंग मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे.

बीड शहरातील भालदारपुरा येथील फारूक खान जहागीरदार मित्र मंडळाने मोठ्या संख्येने आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहिर प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे हात बळकट करण्यासाठी युवकांची मोठी फौज पक्षात दाखल होत असल्याचे सांगत आ.संदीप क्षीरसागर यांनी पक्षात दाखल झालेल्या फारूक खान, इकबाल खान, रेहान खान, कैफ खान, सोहिल खान, सोफियान खान, फैजान खान, हुजेफ खान, शारेक खान, शहेबाज खान, सय्यद फैज, फैमान सय्यद, निजाम शेख, सलमान सय्यद, नासेर खान, मज्जु सय्यद, साबेर सय्यद, सोफियान खान, फैजान पठाण, साहिल शेख, महेबुब पठाण, हसीब खान, अयान पठाण, शाहेद खान, सैफ खान, अदनान शेख, उमर शेख, फरहान खान, अझिम खान, फैजान पठाण, शहेबाज खान, अरफात सय्यद, सद्दाम सय्यद, मुसद्दीर सय्यद, सय्यद सैद, अमर खान, शब्बीर शेख, फेरोज खान राष्ट्रवादी परिवारात स्वागत केले.

### २०१९ ला क्षीरसागरांमुळे

पाटील हाच पक्ष आहे. मी बीड विधानसभेचा अपक्ष उमेदवार असून माझा विजय निश्चित होणार आहे आणि मी विजयी झाल्यानंतर कोणत्याच पक्षात जाणार नाही व कोणत्याच पक्षातील नेत्याला मानणार नाही. असे शिवसेनेला वैतागलेल्या अनिलदादा यांनी पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले. अनिलदादा जगताप यांनी आज दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी आपल्याला कार्यलयात पत्रकार परिषद घेत शिवसेनेकडून झालेल्या अन्यायाला वैतागून आपल्या जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा दिला. याबरोबरच बीड शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी देखील आपला राजीनामा दिला असल्याचे अनिलदादा यांनी स्पष्ट केले.

### ॲड. शेख शफिक

प्रत्यक्ष मतदानाला फक्त एक आठवड्याचा कालावधी उरलेला असतानाही शफिक भाऊंनी अद्याप पर्यंत आपली भूमिका जाहीर न केल्याने मुस्लिम समाजामध्ये शफिक भाऊ काय निर्णय घेतात . यांच्या औवघे मुस्लिम समाजाचे लक्ष लागुन आहे .जेणेकरून मुस्लिम समाजाने बीड विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या उमेदवारांपैकी नेमके कोणत्या उमेदवाराला मतदान करावे याचा निर्णय मतदारांना घेता येईल असे आवाहन नागरिकांकडून करण्यात येत आहे.

लोकसभा निवडणुकीत घेतली होती स्पष्ट भूमिका

काही महिन्यांपूर्वी देशात झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यावेळी सुद्धा एआयएमआयएम पक्षाने बीड लोकसभा मतदारसंघातून उमेदवार दिला नव्हता तसेच लोकभावना व परिस्थिती पाहता यांनी जुलमी भाजपला रोखण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन शफिक भाऊंनी केले होते. यामुळे सर्व मुस्लिम समाजाने एकवटून बजरंग सोनवणे यांना भरघोस मतदान केले होते. यामुळे अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात बजरंग सोनवणे यांना मुस्लिम समाजाने दिलेल्या एक गठ्ठा मतांमुळे व एम आय एम न दिलेला उमेदवार यामुळे विजय मिळाला होता. हा निकाल ताजा असताना यावेळी विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला फक्त एक आठवड्याचा कालावधी उरलेला असतानाही शफिक भाऊ आपली भूमिका स्पष्ट करावी.अशी भावना जनतेतून होत आहे.

### योगेश क्षीरसागरांसाठी

सचिव तथा आ.पंकजाताई मुंडे यांची आज (दि.१२) ४ वाजता सभा होत असून बीडमध्ये माने कॉम्प्लेक्समोरील ग्राउंडवर उद्या (दि.१३) दुपारी दोन वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांची जाहीर प्रचार सभा होणार आहे. या सभेला पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी केले आहे.

### धार्मिक नेत्यांनी पूढे

यांनी काढले आहे. मुस्लिम समाजातील अनेक लोकांची भावना आहे की त्यांचे धार्मिक नेते जर निवडणूक प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी झाले, तर समाजाच्या गरजांचा आवाज अधिक स्पष्टपणे राजकीय व्यवस्थेत पोहोचू शकेल. यामुळे मुस्लिम समाजाच्या प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित करता येईल आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात मदत होऊ शकेल.

बीडमधील निवडणुकांमध्ये मुस्लिम समाजाला जर योग्य प्रतिनिधित्व मिळवून देणे आवश्यक असेल, तर समाजाचे नेते या प्रक्रियेत सक्रियपणे भाग घेऊन योग्य उमेदवारांच्या बाजूने उभे राहणे आवश्यक आहे.असे पत्रकात मझहर खान यांनी म्हटले आहे.

### राजकारणासाठी स्व.गोपीनाथ

मुंडेंच्या प्रतिमा वापरू पाहणाऱ्या माधव निर्मळांना ओबीसी समाज त्यांची लायकी दाखवणार का ? अशी चर्चा होत. वंजारी समाजासह अठरा पगड जाती धर्माचे दैवत मानणाऱ्यांनी निवडणुकीच्या प्रचारात गढूळ विचारांच्या निर्मळांना जनता जाब विचारल्याशिवाय राहणार नाही अशी चर्चा माजलगाव मतदारसंघात होत आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातून अनेक उमेदवार विविध माध्यमातून प्रचार करून भावी आमदार होण्याचे स्वप्न पाहत आहेत. अनेक लोकांना आपल्या नेत्याचे, देवा धर्माचे त्याचबरोबर दैवत मानणाऱ्या महापुरूषांचे फोटो यावर प्रचार करत आहेत. आणि याच माजलगाव मतदारसंघातून अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांनी भावी आमदार होण्याचे स्वप्न उराशी बाळगून आपण निवडून येणार असल्याचे युवा स्वप्न पाहणाऱ्या माधव निर्मळची विचारसरणी आणि मानसिकता गढूळ दर्जाची आहे हे दिसून येत आहे. प्रचाराच्या एका कार्यक्रमात अठरा पगड जाती धर्माचे दैवत असलेल्या गोपीनाथ मुंडेंचा फोटो डोक्यावर घेऊन कार्यक्रम घेतला.या कार्यक्रमातून आपण गोपीनाथ मुंडेंना पंकजा मुंडेंना दैवत मानतो असे बेगडी प्रेम दाखविणाऱ्या गढूळ विचारांच्या निर्मळांनी कार्यक्रम संपताच गोपीनाथ मुंडेंचा फोटो पायंदळी ठेवला. त्यामुळे माधव निर्मळ यांना गोपीनाथ मुंडेंचा फोटो आणि नाव केवळ निवडणुकी पुरते वंजारी समाजासह त्यांना मानणाऱ्या लोकांचे मतदान पदरात पाडून घेण्यासाठी दाखविलेले हे बेगडी प्रेम माजलगाव मतदारसंघातील गोपीनाथ मुंडेंच्या अनुयायांनी पाहीले आहे. त्यामुळे माजलगाव मतदारसंघात तिव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. ठिकठिकाणी गोपीनाथ मुंडेंना दैवत मानणारे लोक माधव निर्मळ यांना जाब विचारणार असल्याची चर्चा माजलागव मतदारसंघात होत आहे.

माधव निर्मळ निवडणूक दोन दिवसांची आहे. मात्र महाराष्ट्रासह देशात गोपीनाथ मुंडेंना दैवत मानणारे लाखो अनुयायी आहेत. त्यांच्या फोटोची अवहेलना तुम्हाला नक्कीच परवडणार नाही .गढूळ विचारांच्या निर्मळणे गोपीनाथ मुंडेंच्या फोटो समोर जाहीर माफी मागावी अशी चर्चा होत आहे. पंकजा मुंडे यांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन गढूळ विचारांच्या माधव निर्मळांची मानसिकता पाहवी आणि समज द्यावी अशी चर्चा होत आहे.सोन्याची दुकाने घेऊन मतदार संघात अवतरलेल्या गढूळ विचारांच्या निर्मळांना माजलगाव मतदार संघाचे सोने लुटण्याचा झालेला मोह आता जागरूक ओबीसी सह इतर मतदारांनी ओळखला आहे. त्यामुळे राजकिय पोळी भाजून घेण्याच्या इराद्यात असलेल्या गढूळ विचारांच्या निर्मळ यांना मतदार स्वीकारणार का ? हाच प्रश्न आहे . गेली २० ते २५ वर्षे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्यासोबत राहुन त्यांना धोका देऊन ओबीसी मराठा आस मतांचं राजकारण करून धोक्यातून जन्मलेल्या आशा स्वयंघोषित पुढार्यांना मतदार कितपत स्वीकारणार ? हे आता काही दिवसात दिसून येणार आहे

### 'मदरशांमधील शिक्षणाची

शिक्षणाची पदवी घटनाबाह्य ठरविल्यानंतर सध्या हे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांना अन्य मान्यताप्राप्त विद्यापीठात सामावून घेण्याची मागणी होत आहे. या प्रकरणातील सर्व कायदेशीर बाबींचा विचार करून मार्ग काढू, असे राज्य सरकारने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने पाच नोव्हेंबर रोजी दिलेल्या आदेशात उत्तर प्रदेश मदरसा बोर्ड बोर्डातर्फे देण्यात येणारी कामिल आणि फजिल पदवी विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगू घटनाबाह्य ठरविली होती. त्यानंतर एकच वाद निर्माण झाला होता. मदरसा शिक्षक संघटनेचे सरचिटणीस जमाल खान म्हणाले, 'न्यायालयाच्या या निर्णयामुळे सध्या हजारो विद्यार्थ्यांसाठी कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण बोर्ड आता या अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेऊ शकणार नाही. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश अंतिम आहे; परंतु मदरसा बोर्डाच्या या अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय राहू नये, यासाठी निर्माण झालेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सरकारने काही तरी मार्ग काढावा.

'मदरसा बोर्डाचे रजिस्ट्रार आर. पी. सिंह यांनी सांगितले, 'सध्या बोर्डामार्फत चालविल्या जाणाऱ्या कामिल आणि फजिल अभ्यासक्रमात सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि सरकार जो निर्णय घेईल त्याचे पालन केले जाईल.' दरम्यान, उत्तर प्रदेशात सुमारे २५,००० मदरसे आहेत. त्यापैकी १६,५०० मदरसे राज्य बोर्डाकडून मान्यताप्राप्त असून, ८५०० विनामान्यताप्राप्त आहेत, असे सरकारी सूत्रांनी म्हटले आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अभ्यास करून आणि त्याच्या विविध कायदेशीर बाबींवर चर्चा करून सरकार निश्चितपणे मार्ग काढेल. विद्यार्थ्यांचे म्हणणेही समजावून घेतले जाईल.

### महाआघाडी सत्तेत आल्यास

आदित्य ठाकरे यांची प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगीबते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेना नेते लक्ष्मण वडले, माजी आ.सुनील धांडे, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर, युधाजित पंडित यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आज या निवडणुकीत राज्यभरात भाजप जुमलेबाजी करतंय, राज्यभरात रोज कित्येक शेतकरी आत्महत्या करत आहेत अन हे खोके सरकार शेतमालाचे भाव कमी करून खताचे भाव वाढवत आहे.

आज देशाचे कृषिमंत्री राज्यात कुठंतरी शेतकऱ्यांच्या बांधावर आलेले दिसले नाही. भाजप सरकारने तरुणांसाठी एकही नोकरी उपलब्ध करून दिली नाही. राज्यातील उद्योगधंदे त्यांनी गुजरातला हलवले, म्हणून भाजप अन मिंदे हे महाराष्ट्र द्वेषी आहेत. राज्यात अनेक प्रश्न असताना यांना फक्त सत्ता मिळाली पाहिजे यासाठी या तिघांमध्ये स्पर्धा चालू आहे. राज्यात नोकर भरती करत नाहीत. तरुणांच्या हाताला काम मिळत नाही. म्हणून कित्येक तरुण बेरोजगार होत आसताना या सरकारने त्यांच्या हाताला काम मिळावे म्हणून काहीच केले नाही. भाजपची लाडकी बहीण योजना फसवी, २०१४ मध्ये १५ लाख देणार होते त्यांनी दहा वर्षानंतर पंधराशे रुपये दिले. म्हणून ही योजना फसवी आहे. म्हणून राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यास लाडक्या बहिणीची तीन हजार रु देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एकनाथ शिंदे आणि भाजपने हा महाराष्ट्र कुठे नेवून ठेवलाय कळायला तयार नाही.

कोविड काळात उद्धव साहेबांनी या राज्यातील जनतेची सेवा केलेली आहे. ती कुणीच विसरू शकत नाही. आज राज्यातील आरोग्य सेवा कोलमडलेली आहे. येणाऱ्या काळात जनतेच्या आरोग्यासाठी पंचवीस लाखाची कॅशलेस सेवा उपलब्ध करून देणार आहे. म्हणून येणाऱ्या काळात आपले मुख्य ध्येय हेच असेल ते म्हणजे रोजगार निर्मिती. सत्तेवर आल्यास आपले सरकार पंचसूत्री नुसार काम करणार आहे. जे भाजप आपल्याला हिंदूत्वाबद्दल बोलत आहेत. आपल्या मुस्लीम बांधवांवर संशय निर्माण करत आहेत. परंतु जनता आता हुशार आहेत जात पात विसरून एक दिलाने पुढे जात आहे. एकनाथ शिंदेंनी स्वतःला वाचवण्यासाठी भाजपची साथ देऊन आपला पक्ष चोरला असून आता महाराष्ट्रातील जनता या गद्दारांना घरी बसवल्याशिवाय राहणार नाही. म्हणून येणाऱ्या २० तारखेला आपले उमेदवार बदामरावजी पंडित हांना विजयी करून आपली मशाल पेटून राज्यातील अंधार दूर करा असे आवाहन युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले. या सभेला गेवराई मतदार संघातून मोठ्या संख्येने मतदार बांधवांची उपस्थिती होती.

पंचवीस वर्षांपासून मी जनतेच्या सेवेत मला पुन्हा एकदा सेवेची संधी द्या – बदामराव पंडित

गेवराई विधानसभा मतदार संघात मी गेल्या पंचवीस वर्षांपासून जनतेच्या सेवेत आहे. याच मायबाप जनतेने मला तीन वेळा या मतदार संघातील जनतेची सेवा केलेली आहे. म्हणून या निवडणुकीतही मतदार संघातील जनतेने २० तारखेला मशाल या चिन्हावर मतदार करून मला पुन्हा एकदा आपली सेवा करायची संधी द्या असे आवाहन माजी मंत्री तथा महाविकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांनी केले.

### हिंदूंच्या संख्येत

माहिती अशी की, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सने याविषयीचा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे.त्यानुसार आता मुंबईमध्ये हिंदूंची संख्या ८८ ते ६६ टक्क्यांवर आली आहे. तसेच या अहवालानुसार, १९६१ मध्ये मुंबईत हिंदूची संख्या ही तब्बल ८८ टक्के होती. मात्र त्यानंतर २०११ मध्ये तीच संख्या ६६ टक्क्यांपर्यंत खाली घसरली आहे. तर या ५० वर्षांत हिंदूंच्या संख्येत केवळ ८ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आल्याचं दिसत आहे.

अहवालानुसार, १९६१ मध्ये मुस्लिम लोकसंख्या फक्त ८ टक्के होती. तर २०११ पर्यंत ही लोकसंख्या तब्बल २१ टक्के झाली आहे. मात्र आता लोकसंख्येचे हे गुणोत्तर प्रमाण असेच राहिले तर पुढील ४० वर्षांत हिंदू लोकसंख्या ही ५४ टक्क्यांहून अधिकने कमी होण्याची भीती वर्तवण्यात आली आहे.याशिवाय मुंबईमध्ये पुढील ४० वर्षात मुस्लिम लोकसंख्या जवळपास ३० टक्क्यांहून अधिकने वाढण्याची शक्यता या अहवालात वर्तवली आहे.